## _Nave_Niyam3 धारिका

**सूचना**

१. आतापर्यंतचे वेळोवेळी कळलेले आणि पालटलेले सर्व नियम एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. सोबत ठेवलेल्या PDF फाईल्समध्ये ती सर्व सूत्रे एकत्र केली आहेत. **कृपया कोणीही त्या आपल्याकडे कॉपी करून घेऊ नयेत.**
२. या PDF धारिकांतील सर्व नियम अद्ययावत असून यापुढे येणारे पालट, धोरणे इत्यादींविषयी _Nave_Niyam3 या धारिकेतून वेळोवेळी सर्वांना कळवले जाईल.
३. या व्याकरण संचिकेत केवळ PDF धारिकाच असतील. _Nave_Niyam3 या धारिकेत कोणातही नवीन नियम घालयचा असल्यास तो संबंधित साधकांनी श्री. अमोल बधाले यांच्यांकडे द्यावा. त्यांच्याकडे दिल्यावर ते या धारिकेत नियम घालतील आणि PDF अपडेट करून सर्वांना नवीन नियम कळवतील.

**– संकलन विभाग**

-------------------

**सूत्र. ६४ उपाधी**

**सनातनचे देहत्याग केलेले संत आणि निधन झालेले साधक यांच्या नावांपूर्वी 'कै.' ही उपाधी लिहिण्याची पद्धत**

**१. देहत्याग केलेल्या संतांची नावे पुढीलप्रमाणे लिहावीत –**

आतापर्यंत आपण देहत्याग केलेल्या संतांची नावे लिहितांना प्रथम 'पू.' लिहीत असू आणि त्यानंतर 'कै.' लावून संतांचे नाव लिहीत असू, उदा. पू. (कै.) पद्माकर होनप. मात्र समाजात प्रचलित असलेल्या पद्धतीनुसार 'कै.' हे प्रथम लिहिले जाते आणि नंतर व्यक्तीच्या उपाधीसह तिचे नाव लिहिले जाते. आपण निधन झालेल्या साधकांच्या संदर्भात हेच सूत्र वापरत आहोत. केवळ संतांच्या संदर्भात 'पू.' प्रथम लिहून नंतर '(कै.)' लिहीत आहोत. समाजाच्या दृष्टीने हे योग्य नाही. त्यामुळे आता संतांच्या संदर्भातही 'कै.' प्रथम लिहून नंतर नाव लिहिण्याचे सूत्र अवलंबायचे ठरले आहे. म्हणजे संतांचे नाव 'कै. पू. पद्माकर होनप' असे लिहावे. अन्य संतांची नावे उदाहरणादाखल पुढे दिली आहेत –

कै. पू. (सौ.) निर्मला होनप
कै. पू. प्रा. रत्नाकर मराठे
कै. सद्गुरु (सौ.) आशालता सखदेव

**२. निधन झालेल्या आणि आध्यात्मिक पातळी असलेल्या अन् नसलेल्या साधकांची नावे पुढीलप्रमाणे लिहावीत –**

कै. (सौ.) ऋतुजा चव्हाण
कै. डॉ. आदगोंडा पाटील
कै. (कु.) दीप्ती पंत
कै. (श्रीमती) अलका जोग
कै. धैवत वाघमारे

– सुश्री सुप्रिया नवरंगे (२७.७.२०२६)
---

**सूत्र. ६३ सूक्ष्म ज्ञानप्राप्तकर्ते + नाव**

यापूर्वी आपण सूक्ष्म ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांच्या धारिकेत शेवटी त्या साधकाचे नाव लिहून कंसात **(सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान)** असे लिहित होतो. आता प्रमुख साधकांनी त्या साधकाचे नाव आणि कंसात **(सूक्ष्मातील ज्ञानप्राप्तकर्ता साधक),** असे लिहिण्यास सांगितले आहे. त्याचे उदाहरण पुढे दिले आहे.

**पूर्वीची पद्धत**

– श्री. राम होनप **(सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान)**, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक १८.११.२०२५, वेळ : दुपारी १२ आणि एकूण कालावधी : ५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक : १८.११.२०२५ आणि एकूण कालावधी : ३५ मिनिटे) ॐ

**प्रमुख साधकांनी सांगितलेली नवीन पद्धत**

–श्री. राम होनप **(सूक्ष्मातील ज्ञानप्राप्तकर्ता साधक)**, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक : १८.११.२०२५, वेळ : दुपारी १२ आणि एकूण कालावधी : ५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक : १८.११.२०२५ आणि एकूण कालावधी : ३५ मिनिटे) ॐ

**टीप : प्रमुख साधकांनी पुढील पालट २३.१.२०२६ या दिवशी**
Dn_RamH_Ghadyal_Baju25 या धारिकेत सांगितला आहे.
सूचना लिहिणारा – श्री. राम होनप (२५.१.२०२६)

**सूत्र. ६२ शब्द + शब्द लिहिणे + शब्द वापरणे + सद्गुरु**

सद्‌गुरु यात द्‌गु जोडलेले दिसायला नको – प्रमुख साधक (३.१.२०२६)

**सूचना : ‘सद्‌गुरु’ शब्द लिहितांना ‘द्’ वापरण्याची योग्य पद्धत**

**सद्‌गुरु या शब्दातील ‘द’ चा पाय मोडून लिहिण्याच्या दोन पद्धती आहेत.**

**पहिली पद्धत :** ‘द’ लिहिल्यानंतर लगेच shift आणि D हे बटण दाबणे – असे केल्यावर **‘द्’** अशा प्रकारे दिसतो

**दुसरी पद्धत :** ‘द’ लिहिल्यानंतर स्पेस द्यायची आणि नंतर स्पेस काढून shift आणि D हे बटण दाबणे – असे केल्यावर **‘द्’** अशा प्रकारे दिसतो.

**दोन्ही पद्धतीचा योग्य वापर कधी करावा, ते पुढे देत आहे.**

१. सद्‌गुरु हा शब्द bold (ठळक) न करता लिहितांना **पहिली पद्धत वापरावी.**

२. **सद्‌गुरु** हा शब्द **bold (ठळक)** करून वापरतांना **दुसरी पद्धत वापरावी.**

असे केल्याने ‘द्‌गु’ हे जोडून येणार नाही.

(सूचना लिहिणारा : अमोल (७.१.२०२६)
-----

~~सूत्र. ६१~~

~~‘आतापर्यंत सूक्ष्म ज्ञानाच्या लिखाणाखाली आपण पुढीलप्रमाणे नाव आणि इतर माहिती लिहित होतो.~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक, वेळ आणि एकूण कालावधी : २.११.२०२५, सकाळी १०.३०, १० सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक आणि एकूण कालावधी : २.११.२०२५, १ घंटा)~~

~~‘यापुढे सूक्ष्म ज्ञानाच्या लिखाणाखाली पुढीलप्रमाणे नाव आणि इतर माहिती लिहावी’, असे प्रमुख साधकांनी सांगितले आहे.~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक : २.११.२०२५, वेळ : सकाळी १०.३० आणि एकूण कालावधी : १० सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक : २.११.२०२५ आणि एकूण कालावधी : १ घंटा)~~

~~(सूचना लिहिणारी : सुश्री दीपाली होनप (११.१२.२०२५))~~
-----

**सूत्र. ६० संकलन + हस्तलिखित + मथळा**

**हस्तलिखितांच्या संकलनाविषयीचे सूत्र**

‘काही वेळा परात्पर गुरु डॉक्टरांनी हस्तलिखिताच्या लिखाणाला मथळा दिलेला असतो. त्या वेळी आपल्याला लिखाणाच्या आशयाला धरून आणखी चांगला मथळा सुचला, तर परात्पर गुरु डॉक्टरांनी दिलेल्या मथळ्याऐवजी आपण आपला मथळा देऊ शकतो’, असे प्रमुख साधकांनी सांगितले आहे.’ (सूचना लिहिणारी – सुश्री दीपाली होनप

(२२.११.२०२५))
-----

**सूत्र. ५९ पारिवारिक कोष**

**संगीतास्त्र :** सूक्ष्मातील युद्धात वाईट शक्तींशी लढतांना ज्या प्रमाणे बीजमंत्रांचा वापर केला जातो, त्या प्रमाणे भारतीय शास्त्रीय संगीतातील स्वरांचा वापर लढण्यासाठी करणे, याला 'संगीतास्त्र' म्हणतात. (ही व्याख्या निषाद देशमुख आणि कु. सुप्रिया नवरंगे यांच्याकडून अंतिम केलेली आहे. प्रमुख साधकांनी ही वाचलेली आहे. – सौ. श्रद्धा १३.११.२०२५)

**वाईट शक्तीचे स्थान :** वाईट शक्ती साधकाच्या देहात एखाद्या ठिकाणी किंवा सप्तचक्रांपैकी एका अथवा अधिक चक्रांवर सतत काळ्या शक्तीचे प्रक्षेपण करून तिथे पुष्कळ प्रमाणात काळी शक्ती साठवतात. असे करून त्या जागेचे रूपांतर एखाद्या बालेकिल्ल्यासारखे केले जाते. त्या ठिकाणाला 'वाईट शक्तीचे स्थान' असे म्हणतात. ते स्थान पूर्णपणे वाईट शक्तीच्या नियंत्रणात असते. त्याद्वारे त्या साधकाला मोठ्या प्रमाणावर आणि वेगवेगळ्या प्रकारे शारीरिक अन् मानसिक त्रास देऊ शकतात. (१३.३.२०२४)

**न्यास :** हाताच्या बोटांची विशिष्ट मुद्रा करून तिचा शरिराच्या एखाद्या भागास स्पर्श करणे किंवा ती मुद्रा त्या भागाजवळ धरणे, याला 'न्यास' म्हणतात. (१३.३.२०२४)

– सौ. श्रद्धा १३.११.२०२५)
-----

**सूत्र. ५८ संकलन + पंचतत्त्व**

**लिखाणात पंचतत्त्वांचा उल्लेख करण्याविषयी सूत्र**

**पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश – अशा प्रकारे सगळीकडे पंचतत्त्वांचा उल्लेख करावा. केवळ अध्यात्मविषयक लिखाणात नको. अध्यात्मविषयक लिखाणात पंचतत्त्वांचा उल्लेख नेहमीप्रमाणे; म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश**

**याप्रमाणे लिहावा. – अमित (२.१२.२०२५)**

-----

**सूत्र. ५७ पारिवारिक कोष**

**आध्यात्मिक स्तरावरील उपायांच्या संदर्भातील व्याख्या**

**१. हस्त–उपाय :** आध्यात्मिक त्रास असलेल्या व्यक्तीचा त्रास न्यून करण्यासाठी आपल्या हाताच्या बोटांची विशिष्ट मुद्रा करून किंवा तळहातांद्वारे तिच्याकडे शक्ती प्रक्षेपित करणे

**२. नेत्र–उपाय :** आध्यात्मिक त्रास असलेल्या व्यक्तीचा त्रास न्यून करण्यासाठी तिच्या डोळ्यांमध्ये, तसेच तिच्या त्रासाचे स्थान असणाऱ्या कुंडलिनीचक्राच्या स्थानी पाहून उपाय करण्याची एक पद्धत.

वरील व्याख्या सद्गुरु डॉ. मुकुल गाडगीळ यांनी पडताळल्या आहेत.

(सूचना लिहिणारी – सुश्री दीपाली होनप (२५.११.२०२५))

-----

**सूत्र. ५६ शब्द + शब्द वापर + जास्तीतजास्त + अधिकाधिक + इतर + अन्य**

**संकलनाविषयीची काही सूत्रे**

१. ‘जास्तीतजास्त’, हा शब्द मराठी असल्याने तो पालटून ‘अधिकाधिक’, असा शब्द लिहिण्याची आवश्यकता नाही.
२. ‘इतर’ हा शब्द पालटून ‘अन्य’, असा शब्द लिहिण्याची आवश्यकता नाही.
३. ‘अन्यांनी’, ‘अन्यांच्या’, हे शब्द न लिहिता ‘इतरांनी’, ‘इतरांच्या’, हे शब्द वापरावेत.

वरील सूत्रे श्री. मुळ्येकाकांनी सांगितली आहेत.

**संकलन + मथळा + शंखनाद**

४. वेगवेगळ्या जिल्ह्यांतील साधकांच्या शंखनाद महोत्सवाच्या अनुभूती संकलनासाठी येतात. बऱ्याच वेळी या धारिकांना '... या जिल्ह्यातील साधकांना 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या वेळी आलेल्या अनुभूती', असा मथळा असतो. सतत तसे वाचणे वाचकांना कंटाळवाणे वाटू शकते. त्यामुळे लिखाणातील आशय घेऊन मथळा करावा, उदा. तीर्थक्षेत्रासम पावित्र्याची अनुभूती देणारा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'!

वरील सूत्र श्री. भानु पुराणिक यांनी सांगितले आहे.'

(सूचना लिहिणारी : सुश्री दीपाली होनप, १७.११.२०२५)
-----

**Ssrf + छापू नये**
**सूत्र. ५५**

एस्.एस्.आर्.एफ्.च्या साधकांचे काही लिखाण (अनुभूती, लेख इत्यादी), जे दैनिकात प्रसिद्ध करू शकत नाही. ते केवळ circulation साठी द्यायचे असते. अशा लिखाणातील साधकांची नावे, देश, आश्रम, प्रकटीकरण यांसंदर्भात 'छापू नये' असे न करता, ते लिखाण आहे तसे ठेवावे.

एस्.एस्.आर्.एफ्.च्या साधकांचे जे लिखाण (अनुभूती, लेख इत्यादी) दैनिकात प्रसिद्ध करू शकतो, त्यात आवश्यक त्या ठिकाणी 'छापू नये' असे लिहावे. तसेच लिखाणातील साधकांची नावे, देश, आश्रम, प्रकटीकरण यांसंदर्भात 'छापू नये' असे लिहावे.

- मयुरा आलुर, ३.१०.२०२५
-----

**सूत्र. ५४ मासिक + आदिमाता**

'आदिमाता' या मासिकातील लेख छापणार, त्या वेळी त्यातील लेखकांची नावे छापू नये. केवळ 'आदिमाता मासिक' असे छापावे', असा निरोप आदिमाता प्रकाशनाकडून दिला आला आहे. त्यामुळे यापुढे पुढील प्रमाणे छापावे.

साभार : आदिमाता मासिक, (मासिकाचा महिना)

**(सूत्र लिहिणाऱ्या : सौ. सारिका आय्या (३.१०.२०२५))**

**-----**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले + सत्संग + भेट + दिनांक + छापू नये**

**सूत्र. ५३**

आतापर्यंत आपण धारिकेच्या खाली 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी साधकांना सत्संगात केलेले मार्गदर्शन', असे लिहून किंवा नुसताच सत्संगाचा दिनांक लिहीत होतो आणि दिनांकापुढे **( – छापू नये.)** असे करत होतो. यापुढे संकलकांनी दिनांका पुढे – **छापू नये.** असे लिहू नये.

आता पुढीलप्रमाणे लिहावे. (सत्संगाचा दिनांक १९.७.२०२४) ॐ

**(सूत्र लिहिणाऱ्या : सौ. सुजाता कुलकर्णी (२७.९.२०२५))**

**-----**

**~~सूत्र. ५२~~ – नियम क्रमांक ६३ अंतिम आहे**

~~'आतापर्यंत सूक्ष्म ज्ञानाच्या लिखाणाखाली आपण पुढीलप्रमाणे नाव लिहित होतो आणि 'केवळ लाल रंगातील माहिती दैनिक अन् ग्रंथ यांत छापावी', अशी टीप लिहित होतो.~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक, वेळ आणि एकूण कालावधी : ३१.५.२०२५, सकाळी ११, १५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक आणि एकूण कालावधी : ६.६.२०२५, १ घंटा)~~

~~**आता प्रमुख साधकांनी वरील सर्व माहिती छापायला सांगितली आहे. त्यामुळे ती सर्व माहिती पुढीलप्रमाणे काळ्या रंगातच ठेवावी आणि टीप लिहू नये.**~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक, वेळ आणि एकूण कालावधी : ३१.५.२०२५, सकाळी ११, १५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक आणि एकूण कालावधी : ६.६.२०२५, १ घंटा)'~~

~~(सूत्र लिहिणारी : सुश्री दीपाली होनप (१६.९.२०२५))~~

-----

संकलन + उल्लेख + सनातन संस्था + स्थापना + वर्ष

**सूत्र. ५१**

साधक लिखाण देताना, तसेच आपण संकलन करून देताना साधकांच्या लेखनात खालीलप्रमाणे उल्लेख आढळतो:
उदा.
१. वर्ष १९९७ मध्ये आमच्या घराच्या शेजारीच सनातन संस्थेचा सत्संग चालू झाला.
२. वर्ष १९९५ मध्ये मी सनातन संस्थेच्या संपर्कात आलो.

मात्र, येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे – सनातन संस्थेची अधिकृत स्थापना वर्ष १९९९ साली झाली आहे. त्यामुळे या संस्थेचा उल्लेख १९९९ पूर्वीच्या घटनांसंदर्भात करणे वास्तवाशी विसंगत ठरते.

त्यामुळे अशा प्रकारचे लिखाण वापरले जाऊ नये. त्याऐवजी, खाली दिल्यानुसार योग्य पर्यायी मांडणी करता येईल :

**योग्य मांडणी**

अ. *१९९० पूर्वी* ज्यांनी साधनेला प्रारंभ केला, त्यांच्या लेखात –
'गुरुदेवांच्या अध्यात्मशास्त्रावरील अभ्यासवर्गातून साधनेला प्रारंभ झाला', असा उल्लेख करता येईल.

आ. १९९० ते १९९८ या कालावधीत ज्यांनी साधनेला प्रारंभ केला, त्यांच्या लेखात –
'गुरुदेवांच्या मार्गदर्शनानुसार साधना व अध्यात्मप्रसार करणाऱ्या साधकांच्या सत्संगांच्या माध्यमातून साधनेला प्रारंभ झाला.'
किंवा 'सनातन भारतीय संस्कृती संस्थेच्या माध्यमातून साधनेला प्रारंभ झाला.' असा

उल्लेख करता येईल.

इ. १९९९ किंवा त्यानंतर ज्यांनी साधनेला प्रारंभ केला, त्यांच्या लेखांमध्ये – ‘सनातन संस्था’ असा स्पष्ट उल्लेख करता येईल.

(सूत्र लिहिणारा : अमोल बधाले (३१.७.२०२५ ( संदीप शिंदे यांच्याशी बोलून वरीलप्रमाणे केले आहे))

-----

~~सूत्र. ५०~~ **नियम क्रमांक ६३ अंतिम आहे**

~~‘आतापर्यंत सूक्ष्म ज्ञानाच्या लिखाणाखाली आपण पुढीलप्रमाणे नाव लिहित होतो.~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक, वेळ आणि एकूण कालावधी : ३१.५.२०२५, सकाळी ११, १५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक आणि एकूण कालावधी : ६.६.२०२५, १ घंटा)~~

~~आता ‘ग्रंथ आणि दैनिक यांत छापतांना पुढील माहितीपैकी केवळ लाल अक्षरांतील माहिती छापावी. संशोधनाविषयीच्या लेखांसाठी सगळी माहिती छापावी’, असे प्रमुख साधकांनी सांगितले आहे.~~

~~– श्री. राम होनप (सूक्ष्मातून प्राप्त झालेले ज्ञान), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (ज्ञान मिळण्याचा दिनांक, वेळ आणि एकूण कालावधी : ३१.५.२०२५, सकाळी ११, १५ सेकंद; ज्ञानाचे टंकलेखन अन् संकलन करण्याचा दिनांक आणि एकूण कालावधी : ६.६.२०२५, १ घंटा)~~

~~संकलकांनी वरील माहितीला लाल रंग द्यावा आणि त्याखाली ‘दैनिक आणि ग्रंथ यांत केवळ लाल रंगातील माहिती छापावी’, अशी टीप लिहावी.~~

~~ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांनी माहितीला लाल रंग देऊन त्याखाली वरील टीप लिहिली, तर संकलकांना साहाय्य होईल.’~~

~~(सूचना लिहिणारी : सुश्री दीपाली होनप (२२.६.२०२५))~~

-----

## सूत्र. ४९. सेवाकेंद्र + उल्लेख + शिव + मुंबई

१. शिव सेवाकेंद्र न म्हणता 'मुंबई सेवाकेंद्र' असे म्हणावे.

२. धन्वन्तरि हा शब्द योग्य शब्द आहे.

– गांधीकाका (११.६.२०२५)

-----

## सूत्र. ४८ संकलन + संस्कृत + हिंदी + पडताळले + नाव

आतापर्यंत संस्कृत, हिंदी भाषांतील लिखाण पडताळणारे साधक पडताळलेल्या ठिकाणी त्यांचे केवळ नाव लिहित होते, उदा. **(पडताळले – सौ. दीप्ती).** आता प्रमुख साधकांनी ते पडताळणाऱ्या साधकांना त्यांचे आडनावही लिहायला सांगितले आहे, म्हणजे त्यांनी **(पडताळले – सौ. दीप्ती आगाशे)**, असे लिहायचे आहे.

आपण संबंधित पडताळणाऱ्या साधकांना ही सूचना कळवली आहे. ते नवीन धारिकांत तसा पालट करतील; पण तोपर्यंत संकलनाला येणाऱ्या धारिकांत संकलकांनी वरील पालट करावा.

(सूचना लिहिणारी : सुश्री दीपाली होनप (५.५.२०२५))

-----

## सूत्र. ४७ संदर्भ + ग्रंथ + डॉ. (सौ.) कुंदा जयंत आठवले

**धोरण पाठवले – सौ. अरुणा (२९.४.२०२५)**

**डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांनी 'गुरुगाथा : खंड १ ते ५' हे लिहिले आहेत. या ग्रंथातील लिखाण इतर ठिकाणी (ग्रंथ, दैनिक इत्यादी ठिकाणी) घेतांना डॉ. (सौ.)**

**कुंदाताई यांचे नाव / ग्रंथाचा संदर्भ द्यायला हवा. याविषयी धोरण –**

१. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांच्या ग्रंथातील जसेच्या तसे पूर्ण लिखाण (पूर्ण प्रसंग) आपण इतर ग्रंथात घेतले असेल / घेत असू, तर नेहमीप्रमाणे पूर्ण संदर्भ द्यावा, उदा. (संदर्भ : डॉ. [सौ.] कुंदा जयंत आठवले लिखित सनातनचा ग्रंथ '?????')

२. डॉ. (सौ.) कुंदा आठवले यांच्या लिखाणातील संपादित अंश (त्यांच्या सविस्तर लिखाणाचा सारांश) आपण इतर ग्रंथात घेतला असेल / घेत असू, तर असे लिहावे (डॉ. [सौ.] कुंदा जयंत आठवले लिखित '?????' या सनातनच्या ग्रंथातील लिखाणाचा संपादित अंश)

– मुळ्ये, २५.४.२०२५
– रूपाली कुलकर्णी (२२.४.२०२५)
-----

## सूत्र. ४६ संकलन + उल्लेख + शब्दप्रयोग + नाडीपट्टी + नाडीपट्टीवाचन + नाडीवाचन

**नाडीपट्टीवाचनाच्या संदर्भातील सूत्रे**

१. 'महर्षींनी आज्ञा केली', 'महर्षींनी सांगितले', असे शब्दप्रयोग करू नयेत.

२. 'महर्षींनी नाडीपट्टीत उल्लेखिल्यानुसार', 'महर्षींनी नाडीपट्टीत लिहून ठेवल्याप्रमाणे', असे शब्दप्रयोग करावेत.

३. महर्षींनी नाडीपट्टीत पुढील उल्लेख केला आहे, '.....' – असे लिहू शकतो.

४. 'महर्षींनी .... यांच्या माध्यमातून सांगितले', असे लिहू नये. '... यांनी केलेल्या नाडीपट्टीवाचनात... असा उल्लेख आहे', असे लिहू शकतो.

५. सूत्राच्या शेवटी

- सप्तर्षी (पू. डॉ. ॐ उलगनाथन् यांच्या माध्यमातून) – असे लिहू नये.

त्याऐवजी

नाडीपट्टी, नाडीवाचकांचे नाव, वाचन क्र., दिनांक, वेळ, पत्ता इत्यादींपैकी जेवढी माहिती उपलब्ध असेल, त्यानुसार पुढील प्रकारे लिहावे.

‘......’ (भृगु जीवनाडीवाचक श्री. सेल्वम्गुरुजी यांनी केलेले नाडीवाचन, २.५.२०१९)

‘......’ (पू. डॉ. ॐ उलगनाथन् यांनी केलेले सप्तर्षी जीवनाडीवाचन, महर्षि मयन यांची वाणी क्र. ४) (५.५.२०१८, सकाळी ९.३०)

‘......’ (सप्तर्षी जीवनाडीवाचन क्र. २, कोहिनूर हॉटेल, कोईमतूर, तमिळनाडू. [१३.४.२०१५])

‘......’ – वसिष्ठ नाडी (२३.३.२०१५), सूर्यकला नाडी (२४.३.२०१५), शिववाक्य नाडी (मार्च २०१५) आणि भृगु संहिता (२९.५.२०१६)

ही सर्व सूत्रे प्रमुख साधकांनी सांगितली आहेत.

वरील सर्व पालट करण्यामागे ‘महर्षी स्थुलातून काहीतरी कृती करत आहेत’, असे लिखाणातून वाटू नये’, हा उद्देश आहे.

**सूचना लिहिणारी –** सुश्री (कु.) दीपाली होनप (१०.४.२०२५)

-----

**ताडपत्री शब्द आणि याचे दोन अर्थ शब्दकोषात घेणे – अमोल**

## सूत्र. ४५ संकलन + शब्दप्रयोग + ताडपत्री

‘ताडपत्री’ या शब्दाचे ‘ऊन-पावसापासून रक्षणासाठी वापरायचे कापड’ आणि ‘ताडाच्या झाडाचे पान’ असे दोन अर्थ प्रचलित आहेत. त्यामुळे यासंदर्भात सुश्री सुप्रिया नवरंगे यांच्याशी बोलून ग्रंथामध्ये ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’विषयी प्रकरणात (‘बिल्बपत्रांच्या’ या शब्दाप्रमाणे) ताडपत्रांच्या हा वापरला आहे, उदा. ‘नाडीभविष्य ताडपत्रांच्या काही पट्ट्यांवर लिहिलेले असते.’ – श्री. गिरिधर वझे (२३.३.२०२५)

-----

## सूत्र. ४४ संकलन + टीप + शब्द लिहिणे + शब्द वापर

*** ‘टीप’ हा शब्द लिहिण्याविषयीची पू. संदीपदादांनी सांगितलेली धोरणे**

१. जेव्हा आपण लिखाणातील शब्दाचे स्पष्टीकरण देण्यासाठी ‘(टीप)’, असे लिहितो, तेव्हा टीप हा शब्द कंसात घ्यावा आणि त्याचा आकार (फॉण्ट साइज) लहान करावा.

उदा. भगवान श्रीकृष्णाला प्रार्थना करून रिकाम्या खोक्यात नावांच्या सूचीला नामजपाचे मंडल (टीप) करून घालावे.

२. जेव्हा सारणीतील एखाद्या स्तंभात केवळ टीप द्यायची असेल, तेव्हा टीप या शब्दाचा आकार (फॉण्ट साइज) नेहमीएवढाच २० ठेवावा. टीप हा शब्द कंसात घेऊ नये. ‘टीप १ पहा’, असे वाक्यात लिहावे.

उदाहरण पुढे रंगीत करून दाखवले आहे.

| | आजाराचे नाव किंवा त्रास | आजार चालू झाल्याचा मास | अधिक विवेचन |
|---|---|---|---|
| १. | हाडे ठिसूळ होऊ लागणे | – | टीप १ पहा. |
| २. | धाप लागणे | जून २००३ | – |
| ३. | पुष्कळ थकवा असणे | ऑगस्ट २००३ | टीप २ पहा. |
| ४. | दिवसभर गुंगी असणे | ऑगस्ट २००३ | – |

टीप १ – यामुळे हात-पाय दुखणे, हाडे वाकणे, सांधेदुखी, एका जागी फार वेळ स्थिर बसता न येणे, असे त्रास होऊ लागले.

टीप २ – हृदयाच्या चाचण्या वर्ष २००९ मध्ये आणि नंतर वर्ष २०२१ मध्ये केल्या होत्या. त्या चाचण्या सामान्य (नॉर्मल) होत्या.

-----

**ग्रंथ + उल्लेख + देहत्याग + दिनांक**

**सूत्र. ४३**

**सूत्रे पाठवले – आरुणा (७.१.२०२५)**

**मुळ्ये (२५.१२.२०२४)**

**दीपाली होनप (२१.१२.२०२४)**

**प.पू. डॉक्टरांनी ‘गुरुगाथा ग्रंथांत ‘देहत्याग केलेल्या संतांचा देहत्यागाचा दिनांक लिहिणे’, अशी सुधारणा लिहून दिली आहे. – सौ. अरुणा (२७.१०.२०२४)**

**त्यानुसार ग्रंथांसाठी याचे धोरण पुढे दिले आहे.**

१. संकलक तारतम्याने संतांच्या देहत्यागाच्या दिनांकाचा उल्लेख पुढीलप्रमाणे करू शकतो.

अ. जेथे लिखाणात देहत्यागाच्या दिनांकाचा उल्लेख करणे शक्य नसेल, तेथे संतांच्या अल्प परिचयाला दिलेल्या मथळ्यातच तसा उल्लेख करावा, उदा.
**प.पू. भक्तराज महाराज (देहत्याग – १७.११.१९९५) :** प.पू. भक्तराज महाराज यांनी भजन, भ्रमण आणि भंडारा यांद्वारे अध्यात्माचा प्रसार केला. हे प.पू. डॉ. जयंत आठवले यांचे गुरु
---
आ. प.पू. भक्तराज महाराज यांच्यावरील मोठ्या लिखाणात पुढीलप्रमाणे उल्लेख करू शकतो, उदा. प.पू. भक्तराज महाराज यांनी १७.११.१९९५ या दिवशी देहत्याग केला.

प.पू. भक्तराज महाराजांचा परिचय ग्रंथाच्या आरंभी असला आणि त्यात त्यांच्या देहत्यागाचा उल्लेख असला, तर ग्रंथात पुन्हा त्यांच्या देहत्यागाच्या दिनांकाचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

२. ग्रंथमालिकेतील एका खंडात अनेक वेळा एकाच संतांचा उल्लेख आला असेल, तर त्या खंडात केवळ पहिल्या ठिकाणीच त्यांच्या देहत्यागाच्या दिनांकाचा उल्लेख करावा.

३. ग्रंथमालिकेतील विविध खंडांत एकाच संतांचा उल्लेख आला असेल, तर त्या प्रत्येक खंडात एकदा त्यांच्या देहत्यागाच्या दिनांकाचा उल्लेख करावा.
-----

**पारिवारिक कोष**

**ग्रंथ + मर्त्यलोक + टीप**

**सूत्र. ४२**

**सूत्रे पाठवले – आरुणा (७.१.२०२५)**

⁕ **धोरण** – ज्या ग्रंथात ‘मर्त्यलोक’ हा शब्द येईल, त्या ग्रंथात पुढील टीप घ्यावी. – कु. रूपाली (२७.१०.२०२४)

टीप पडताळली : सद्गुरु डॉ. गाडगीळ, पू. संदीप आळशी, श्री. संजय मुळ्ये (२६.१०.२०२४)

**‘मर्त्यलोक’ या शब्दाचा अर्थ :** ‘भूलोक आणि मर्त्यलोक (मृत्यूलोक, पृथ्वीलोक) हे समानार्थी शब्द आहेत’, असे प्रचलित आहे. सनातनच्या साधकांना मिळालेल्या ईश्वरी ज्ञानातून मिळालेल्या माहितीनुसार ‘मर्त्यलोक’ हे मृत्यूलोक आणि भुवलोक यांच्यामधील एक ठिकाण आहे. ते ठिकाण पृथ्वीच्या कक्षेत असल्याने पृथ्वीचाच एक भाग असले, तरी ते प्रत्यक्ष पृथ्वीपासून वेगळे आहे. जे लिंगदेह पृथ्वी सोडतात; पण पुढची गती न मिळाल्याने ते भुवलोकात प्रवेश करू शकत नाहीत, असे लिंगदेह भूलोक आणि भुवलोक यांच्या मध्ये अडकतात. अशा ठिकाणाला या ग्रंथात ‘मर्त्यलोक’ असे संबोधलेले आहे.

-----

**सूत्र. ४१ संकलन + समन्वयक + छायाचित्र**

१. कु. भक्ती रोहन मेहता हिची सात्त्विक वेशभूषेविषयीची धारिका आली होती. त्या धारिकेत सात्त्विक वेशभूषेचा झालेला चांगला परिणाम लिहिला होता. ती धारिका प्रमुख साधकांना पडताळायला देतांना कु. भक्तीचे साध्या वेशातील छायाचित्र जोडले होते. तेथे सात्त्विक वेशभूषेतील छायाचित्र जोडायला हवे होते. ही चूक प्रमुख साधकांना दाखवावी लागली.
२. पू. दातेआजी यांच्या प्रकृती अस्वास्थ्यासंदर्भातील धारिकांचे संकलन चालू आहे. त्या धारिका पडताळायला देतांना प्रत्येक वेळी पू. दातेआजी यांचे रुग्णाईत असलेले छायाचित्र

जोडण्यास सांगितले आहे.

**धोरण** – वरील प्रसंगांवरून जेव्हा एखाद्या विशिष्ट प्रसंगाशी संबंधित लिखाण आले असेल, तेव्हा त्या प्रसंगाशी निगडित छायाचित्रही जोडणे अपेक्षित आहे. त्यानुसार समन्वयक आणि संकलक यांनी प्रसंगाशी संबंधित छायाचित्र जोडल्याची निश्चिती करावी.

-----

**सूत्र. ४० संकलन + उल्लेख + नाव + गाव + तालुका + जिल्हा**

पू. वागळेआजोबा यांच्याविषयी लिखाण असलेली एक धारिका आली होती. त्या धारिकेत **(सनातन संस्थेचे ६५ वे संत पू. (कै.) जनार्दन कृष्णाजी वागळे, देवीहसोळ [राजापूर, जिल्हा रत्नागिरी], देहत्याग १९.३.२०२२)** असा उल्लेख होता. यामध्ये प्रमुख साधकांनी पुढील लाल अक्षरांतील सुधारणा सांगितली.

**(सनातन संस्थेचे ६५ वे संत पू. (कै.) जनार्दन कृष्णाजी वागळे, देवीहसोळ [तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी] यांचा देहत्याग १९.३.२०२२)**

**धोरण**

**१. गावाचे नाव अपरिचित असेल, तर तालुक्याचे नाव लिहितांना तालुका असे लिहावे.**

**संकलन + उल्लेख + संत + देहत्याग + दिनांक**

**२. देहत्याग केलेल्या संतांच्या देहत्यागाच्या दिनांकांचा उल्लेख करावयाचा असल्यासत तसे लिहितांना अमुक संत यांचा देहत्याग... असा उल्लेख करावा.**

– श्री. धैवत वाघमारे, १४.८.२०२४

-----

**संकलन + उल्लेख + जिल्हा + मथळा + नाव**

**सूत्र. ३९**

**नावे पालटलेले जिल्ह्यांविषयी लिखाणात उल्लेख करतांना**

१. साधकांच्या अनुभूती, गुणवैशिष्ट्ये आणि अन्य लिखाणाच्या शेवटी नाव लिहितांना 'सौ. शैलजा केदारी, **शहर आणि जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र'** असे लिहू शकतो.

२. अनुभूती, गुणवैशिष्ट्ये आणि अन्य लिखाणाच्या मथळ्यात लिहितांना 'अहिल्यानगर (महाराष्ट्र – नको) येथील सौ. शैलजा केदारी यांना आलेल्या अनुभूती' असे लिहिता येईल. उदा. – 'अहिल्यानगर येथील सौ. शैलजा केदारी यांना आलेल्या अनुभूती'

– सौ. पल्लवी हंबर्डे (संकलन विभाग) आणि श्री. भूषण केरकर (दैनिक विभाग) (७.४.२०२४)

-----

**सूत्र. ३८ सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले + रथ + विष्णुतत्त्व**

नवीन निरोप : 'साधकों द्वारा निर्मित इस रथ में ७० प्रतिशत विष्णुतत्त्व आकर्षित हुआ है ।' हे वाक्य असेच ठेवावे. – कला विभाग (३०.६.२०२४)

-----

**पारिवारीक कोष**

**सूत्र. ३७**

**'रुग्णाची सेवाशुश्रूषा 'साधना' म्हणून कशी करावी ?' या नवीन लघुग्रंथात आम्ही घेतलेल्या टीपा अभ्यासासाठी/ संग्रहासाठी पाठवत आहे. – कु. करुणा, १३.४.२०२४**

**एनिमा देणे :** यात व्यक्तीच्या गुदमार्गात लवचिक नळी घालून त्यातून औषध सोडून मलाशयात साठलेले शौच बाहेर काढतात.

**भगवंताविषयी भाव असणे :** 'भाव तेथे देव' असे वचन आहे. आपल्या अंत:करणात भगवंताविषयी ओढ निर्माण होणे, याला 'भगवंताविषयी भाव असणे' असे म्हणतात.

**भावजागृतीचा प्रयोग करणे :** 'डोळे बंद करून, मन शांत करून 'भाव जागृत होईल', अशा प्रसंगाची काही वेळ कल्पना करणे', याला 'भावजागृतीचा प्रयोग करणे', असे म्हणतात.

-----

## सूत्र. ३६ वयोगट + संबोधन + मराठी भाषा

**प्रश्न :** दोन साधकांनी व्यक्तींचे 'विविध वयोगट आणि त्या वयोगटांसाठी असलेली संबोधने' यांविषयी विचारले होते. हा विषय यापूर्वीही अभ्यासासाठी आला होता. त्यामुळे 'एकूण धोरण काय असावे ?', या दृष्टीने संस्कृत शब्दकोशांचा अभ्यास करून पुढील धारिका सिद्ध केली आहे. धारिकेत प्रथम प्रचलित मराठीत वापरण्यात येणारी संबोधने आणि नंतर शब्दकोशांत देण्यात आलेली संबोधने देण्यात आली आहेत. आपण कसे लिहिणे योग्य आहे ? – सुश्री (कुमारी) सुप्रिया **– पुढे तक्त्यात तांबड्या अक्षरात उत्तर आहे.**

**१. प्रचलित मराठी भाषेमध्ये वेगवेगळ्या वयोगटांसाठी वापरात असलेली संबोधने**

| | वय (वर्षांमध्ये) | संबोधन |
|---|---|---|
| १. | जन्म ते १२ | बालक |
| २. | १३ ते १८ | कुमार/किशोर |
| ३. | १८ ते २५ | नवयुवक/नवतरुण |
| ४. | २५ ते ४० | युवक/तरुण |
| ५. | ४० ते ६० | प्रौढ<br><br>१. 'प्रौढ' या शब्दासाठी संस्कृत भाषेत 'वयोधा' आणि 'वयोगत' हे दोन शब्द दिले आहेत.<br><br>२. 'प्रौढ'साठी तेलुगू भाषेत 'वयोजन' हा प्रतिशब्द आहे. तेलुगू |

| | | |
|---|---|---|
| | | भाषा ही संस्कृतपासून निर्माण झालेली आहे.<br><br>३. कन्नड भाषेत 'प्रबुद्ध' हा शब्द वापरण्यात येतो. कन्नड भाषाही संस्कृतपासून निर्माण झालेली आहे.<br><br>**प्रश्न :** आपण दैवी साधकांची ओळख करून देतांना 'प्रौढ' या शब्दाऐवजी वरीलपैकी एखादा प्रतिशब्द वापरू शकतो का ? |
| ६. | ६० च्या पुढे | वृद्ध |

**२. संस्कृत आणि मराठी शब्दकोशांमध्ये वेगवेगळ्या वयोगटांसाठी दिलेली संबोधने**

| | वय (वर्षांमध्ये) | संबोधन |
|---|---|---|
| १. | जन्म ते ५ | **बालक – नेहमीसाठीही** |
| २. | ६ ते १० | **कुमार – नेहमीसाठीही** |
| ३. | ११ ते १५ | किशोर **– नेहमीसाठीही** |
| ४. | १६ ते ३० | तरुण/युवक/युवा **– नेहमीसाठीही** |
| ५. | ३१ ते ५९ | **प्रबुद्ध** (दैवी साधकांची ओळख करून देतांना या शब्दाऐवजी वरील सारणीतील एखादा शब्द चांगला वाटल्यास तो वापरू शकतो.)<br>**प्रौढ – नेहमीसाठी** |
| ६. | **६० पासून पुढे** | वृद्ध |

– सुश्री (कुमारी) सुप्रिया शरद नवरंगे, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा.
(१५.१२.२०२१)
-----

**सूत्र. ३५ उपाधी + सुश्री + वय**

**'सुश्री' या उपाधीच्या वापराच्या संदर्भात**

१. लिखाणात ४० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या अविवाहित स्त्रियांचा उल्लेख आल्यास आपण त्यांना 'सुश्री' ही उपाधी लावतो. यापुढे ही उपाधी लावल्यानंतर पूर्ण लेखाच्या शेवटी किंवा लेखाच्या शैलीनुसार योग्य जागा ठरवून पुढीलप्रमाणे टीप लिहावी.

टीप – 'सुश्री' म्हणजे '४० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेली अविवाहित स्त्री' होय.

२. लेखांमध्ये वरीलप्रमाणे टीप येणार असल्यामुळे 'सुश्री' या शब्दाच्या पुढे कंसात (कुमारी) असे जे आपण एवढे दिवस लिहीत होतो, ते आता लिहू नये.

– सुश्री सुप्रिया नवरंगे (४.५.२०२४)

-----

**सूत्र. ३४ संकलन + शब्दप्रयोग + निधन + बातमी + वृत्त + वृद्धापकाळ + वार्धक्या**

**निधनाच्या वृत्तामध्ये 'वृद्धापकाळ' हा शब्द सरसकट वापरणे अयोग्य असणे**

एखाद्या वृद्ध व्यक्तीचे निधन झाल्याच्या वृत्तामध्ये बऱ्याचदा '...यांचे वृद्धापकाळाने निधन झाले', असा उल्लेख केलेला असतो. हा उल्लेख पुढील कारणांमुळे अयोग्य आहे.

१. 'वृद्धापकाळ' हा सामासिक शब्द आहे. त्याची फोड केली असता ती 'वृद्धावस्था हा अपकाळ' (मध्यम पदलोपी कर्मधारय समास) अशी होते. यानुसार विचार करता सर्वच वृद्धांसाठी वृद्धावस्था हा अपकाळ नसतो. सध्याच्या काळात कित्येक वृद्ध व्यक्ती योग्य आहार आणि व्यायाम यांच्या साहाय्याने स्वतःची प्रकृती चांगली टिकवून ठेवतात. अशा व्यक्ती समाजात मिसळून आनंदात राहतात.

२. अनेक वृद्ध व्यक्ती कोणताही आजार न होता चालता-बोलता मृत्यू पावल्याचेही दिसते. या वृद्धांच्या संदर्भातही वृद्धावस्था हा अपकाळ नाही.

त्यामुळे निधनाच्या वृत्तामध्ये 'वृद्धापकाळ' हा शब्द सरसकट वापरणे अयोग्य

आहे. त्या जागी ‘वार्धक्यामुळे निधन’ अशी शब्दयोजना करावी.

– सुश्री सुप्रिया नवरंगे (२१.४.२०२४)
-----

## सूत्र. ३३ संकलन + मूर्ती विसर्जन + धर्मशास्त्र

लिखाणात किंवा तत्सम ठिकाणी ‘मूर्तीचे विसर्जन धर्मशास्त्रानुसार पाण्यामध्ये करावे’, हे योग्य वाक्य म्हणून प्रसिद्ध करू शकतो; मात्र ‘मूर्तीचे विसर्जन धर्मशास्त्रानुसार पाण्यामध्येच किंवा केवळ पाण्यामध्ये करावे’, हे अपूर्ण ज्ञान सांगणारे वाक्य प्रसिद्ध करणे अयोग्य ठरते; कारण धर्मशास्त्रामध्ये ‘आपत्काळात (दुष्काळ, अवर्षण इत्यादी प्रसंगी) पाण्यात मूर्तीचे विसर्जन करू शकत नाही. अशा प्रसंगी मूर्तीच्या विसर्जनासाठी अन्य पर्याय धर्मशास्त्रामध्ये सांगितले आहेत. त्यामुळे यापुढे लिखाणात ‘धर्मशास्त्रानुसार’ हा शब्द लिहिणे आवश्यक असल्यास त्याविषयी ‘सनातन पुरोहित पाठशाळे’तील पुरोहितांना विचारूनच ‘धर्मशास्त्रानुसार’ हा शब्द वापरावा. त्यामुळे पुरोहितांनी पुढील मूळ प्रश्नातून ‘धर्मशास्त्रानुसार’ हा शब्द रहित करायला सांगितला. या शब्दाच्या वापराविषयी कंस-फुली करून एक उदाहरण पुढे दिले आहे.

**अयोग्य वाक्यरचना :** आरती ओवाळून झाल्यानंतर (धर्मशास्त्रानुसार ×)‘आरती ग्रहण करणे, नमस्कार करणे, प्रदक्षिणा घालणे, मंत्रपुष्पांजली अर्पण करणे, प्रार्थना करणे आणि विभूती लावणे’’ या कृती करण्यामागे काही अध्यात्मशास्त्रीय कारणे आहेत का ?

**योग्य वाक्यरचना :** आरती ओवाळून झाल्यानंतर ‘आरती ग्रहण करणे, नमस्कार करणे, प्रदक्षिणा घालणे, मंत्रपुष्पांजली अर्पण करणे, प्रार्थना करणे आणि विभूती लावणे’ या कृती करण्यामागे काही अध्यात्मशास्त्रीय कारणे आहेत का ?

– श्री. गिरिधर वझे, ग्रंथ विभाग, तसेच सर्वश्री अमर जोशी, सिद्धेश करंदीकर आणि मंदार मणेरीकर, सनातन पुरोहित पाठशाळा (२६.४.२०२४)
-----

## सूत्र. ३२ नाव + पदवी + दीपक जोशी

पूर्वी आपण दीपक जोशी यांचे नाव लिहितांना निसर्गोपचार तज्ञ दीपक जोशी असे लिहित होतो.
यापुढे पुढील प्रमाणे लिहावे.

**डॉ. दीपक जोशी, निसर्गोपचार तज्ञ (बॅचलर ऑफ नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स), देवद, पनवेल.**

- अमोल (२८.३.२०२५)

-----

**सूत्र. ३१ शब्दप्रयोग + श्री रामलल्ला**

**श्री रामलल्ला असे यापुढे लिहिण्यामागे कारण**

आपण पूर्वी 'श्री रामलला' असे लिहित होतो. 'श्री रामलला असे का लिहितो ?', असे श्री. नागेश गाडे यांनी विचारले होते. त्याविषयी कु. सुप्रियाताई यांना विचारले असता, त्यांनी 'लला' असा शब्द मराठीत नाही. 'लल्ला' असाच हिंदीमध्ये शब्द आहे. त्यामुळे 'श्री रामलल्ला' असेच लिहिणे अपेक्षित आहे, असे सांगितले आहे.

त्यानुसार यापुढे आपण **श्री रामलल्ला** असे लिहित आहोत.

– सूत्र लिहिले : सौ. समीक्षा गाडे (९.२.२०२४)

-----

**सूत्र. ३० संकलन + उल्लेख + पूर्णवेळ + आश्रम + साधना + सेवा**

**पूर्णवेळ साधकांच्या संदर्भातील सूत्र**

पूर्णवेळ साधकांच्या संदर्भात लिखाणात उल्लेख करतांना आपण पूर्वी '.... हे सनातनच्या आश्रमात पूर्णवेळ सेवा करतात', असे लिहित होतो. यापुढे '.... हे सनातनच्या आश्रमात पूर्णवेळ साधना करतात', असे लिहावे.'

उदा. 'श्री. वैभव कणसे हे सनातनच्या आश्रमात पूर्णवेळ साधना करतात', असे लिहावे.

(सूचना लिहिणारी – दीपाली (१७.१२.२०२३))
-----

**सूत्र. २९ संकलन + कविता + मथळा + संत + नाव**

**८.१२.२०२३ या दिवशीच्या दैनिक खुणांमध्ये 'संतांविषयीच्या कवितेचा मथळा करतांना त्या मथळ्यात संतांच्या नावाचा उल्लेख असायला हवा', असे प्रमुख साधकांनी सांगितले आहे.**

उदा. पू. (सौ.) अश्विनी पवार यांच्याविषयीच्या कवितेला '**पू. अश्विनीताई, तुमच्याप्रती मनी दाटूनी येई केवळ कृतज्ञता ।**', असा मथळा द्यावा.

**२०२१ मध्येही प्रमुख साधकांनी संतांच्या कवितेच्या मथळ्यात संतांचे नाव नसल्याची चूक लक्षात आणून दिली होती.**

**(सूचना लिहिणारा – अमोल, ८.१२.२०२३)**
-----

**नाव + उल्लेख + श्रीसत्‌शक्ति + श्रीचित्‌शक्ति + श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ + श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**

**सूत्र. २८**

**'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' यांच्या नावांचा उल्लेख लेखात करण्याच्या संदर्भातील धोरण**

१. 'लेखात प्रथम एकदा 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ' आणि 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ' असा, त्यानंतर एकदा 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ' अन् 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असा आणि नंतर सर्व ठिकाणी 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) सिंगबाळ' अन् 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) गाडगीळ' असा

उल्लेख करावा.

२. श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदाताई, श्रीचित्‌शक्ति (सौ.) गाडगीळकाकू, तसेच सद्‌गुरु बिंदाताई, सद्‌गुरु गाडगीळकाकू, असा उल्लेख करू नये.

**(सूचना लिहिणारी – कु. दीपाली (२२.११.२०२३)**
-----

**सूत्र. २७ संकलन + संवाद + मांडणी**

**पूर्वी लिखाणात संवाद असेल, तर आपण बोलणाऱ्यांची नावे ठळक करत नव्हतो. आता 'ती नावे ठळक करावीत', असे प्रमुख साधकांनी सांगितले आहे,** उदा.

**श्री. संजय जोशी :** पू. सौरभदादा, पहा, कोण आले आहे ?

**ती. भाऊकाका :** कसं सांगता येईल त्याला ?

**पू. सौरभदादा :** हॅलो, हॅलो. श्री !

**(सूचना लिहिणारी – कु. दीपाली (२२.११.२०२३)**
-----

**सूत्र. २६ शब्दप्रयोग + मोर्चा + प्रत्यय**

**'मोर्चा' या शब्दाला प्रत्यय लागल्यावर 'मोर्च्याला, मोर्च्याचे, मोर्च्याने....', अशी रूप योग्य नसून 'मोर्चाला, मोर्चाचे, मोर्चाने...', ही रूपे योग्य आहेत.**

**(सूचना लिहिणारी – कु. दीपाली (२२.११.२०२३)**
-----

**सूत्र. २५ संकलन + विवाह लेख + अनुक्रम**

**विवाहाच्या धारिकेचे संकलन करण्यासंदर्भातील सूत्र**

**पूर्वी आपण विवाहाच्या धारिकेत वधू आणि वर यांच्या नावांना १ आणि २ असे अनुक्रम देऊन त्यापुढे १ अ., १ आ. ...असे अनुक्रम देऊन सलग एकच धारिका बनवत होतो, उदा.**

**१. चि. राजेंद्र दुसाने यांची जाणवलेली गुणवैशिष्ट्ये**

**१ अ. सौ. काव्या चेऊलकर**

१. ‘राजेंद्रदादा लहान-मोठ्या सर्वांशी आदराने आणि नम्रतेने बोलतो.

२. त्याला सेवा करतांना अडचणी आल्या, तरी तो त्याविषयी कधीही गाऱ्हाणे करत नाही. आहे त्या परिस्थितीत तो जमेल तशी सेवा करत रहातो.’

**१ आ. श्री. वैभव कणसे**

१. ‘राजेंद्रदादा नेहमी हसतमुख असतो. तो सर्वांशी मनमोकळेपणाने बोलतो.

२. दादामधील प्रेमभावामुळे आम्हाला त्याचा मोठ्या भावाप्रमाणे आधार वाटतो.’

**२. चि.सौ.कां. दीपाली माळी यांची जाणवलेली गुणवैशिष्ट्ये**

**२ अ. कु. गीतांजली काणे**

१. ‘दीपालीचे मन निर्मळ आहे.

२. तिच्या प्रेमभावामुळे तिला सगळ्यांविषयी आणि इतरांना तिच्याविषयी आपलेपणा जाणवतो.’

**२ आ. कु. वर्षा जबडे**

१. ‘दीपालीचे अक्षर सुंदर असल्याने ती सणांच्या वेळी फलकावर सणांच्या संदर्भातील लिखाण आणि इतर वेळी सूचनांचे लिखाण करण्याची सेवा कौशल्याने करते.

२. ती माझ्याकडून होत असलेल्या चुकांची मला जाणीव करून देते, तसेच ‘त्या चुकांवर मात कशी करू शकतो ?’, याविषयी सहजतेने सांगते.’

**आता वर आणि वधू यांच्या नावांना अनुक्रम देऊ नयेत. पुढीलप्रमाणे संकलन करावे.**

**चि. राजेंद्र दुसाने यांची जाणवलेली गुणवैशिष्ट्ये**

**१. सौ. काव्या चेऊलकर**

अ. ‘राजेंद्रदादा लहान-मोठ्या सर्वांशी आदराने आणि नम्रतेने बोलतो.

आ. त्याला सेवा करतांना अडचणी आल्या, तरी तो त्याविषयी कधीही गाऱ्हाणे करत नाही. आहे त्या परिस्थितीत तो जमेल तशी सेवा करत रहातो.’

**२. श्री. वैभव कणसे**

अ. ‘राजेंद्रदादा नेहमी हसतमुख असतो. तो सर्वांशी मनमोकळेपणाने बोलतो.

आ. दादामधील प्रेमभावामुळे आम्हाला त्याचा मोठ्या भावाप्रमाणे आधार वाटतो.’

---------------------------- **( अशा प्रकारे ओळही घालावी)**

**चि.सौ.कां. दीपाली माळी यांची जाणवलेली गुणवैशिष्ट्ये**

**१. कु. गीतांजली काणे**

अ. ‘दीपालीचे मन निर्मळ आहे.

आ. तिच्या प्रेमभावामुळे तिला सगळ्यांविषयी आणि इतरांना तिच्याविषयी आपलेपणा जाणवतो.'

**२. कु. वर्षा जबडे**

अ. 'दीपालीचे अक्षर सुंदर असल्याने ती सणांच्या वेळी फलकावर सणांच्या संदर्भातील लिखाण आणि इतर वेळी सूचनांचे लिखाण करण्याची सेवा कौशल्याने करते.

आ. ती माझ्याकडून होत असलेल्या चुकांची मला जाणीव करून देते, तसेच 'त्या चुकांवर मात कशी करू शकतो ?', याविषयी सहजतेने सांगते.'

**'वर आणि वधू यांच्या नावांना अनुक्रम न दिल्याने वराच्या छायाचित्राखाली त्याची सूत्रे अन् वधूच्या छायाचित्राखाली तिची सूत्रे सहजतेने छापता येतात', असे गांधीकाकांनी सांगितले आहे.'**

**(सूचना लिहिणारी – कु. दीपाली (२२.११.२०२३)**

-----

**सूत्र. २४ संकलन + एकेरी अवतरणचिन्ह + योग्य वापर**

**एकेरी अवतरणचिन्हाच्या वापराच्या संदर्भात पुढे एक उदाहरण आणि त्यासंबंधीचे विवेचन दिले आहे. –**

**उदाहरण –**

**टीप – 'व्यष्टी साधना' आणि 'समष्टी साधना' :** 'साधना' म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी प्रतिदिन करायचे प्रयत्न. 'गुरुकृपायोग' या साधनामार्गानुसार करायच्या साधनेचे 'व्यष्टी साधना' आणि 'समष्टी साधना' असे दोन प्रकार आहेत. 'व्यष्टी साधना' म्हणजे, 'वैयक्तिक आध्यात्मिक उन्नतीसाठी करायचे प्रयत्न', उदा. नामजप करणे. 'समष्टी साधना' म्हणजे 'समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी करायचे प्रयत्न', उदा. समाजात

जाऊन नामाचा प्रसार करणे, धर्मजागृती करणे.

१. वरील टीपेत अनावश्यक अवतरणे, स्वल्पविराम आदी नाहीत.

२. विषय कोणताही असला, तरी ज्या वेळी आपण त्यातील एखाद्या पारिभाषिक शब्दाची व्याख्या देतो, तेव्हा तो पारिभाषिक शब्द आणि त्याची व्याख्या या दोहोंनाही अवतरणचिन्ह देणे आवश्यक आहे.

३. एखाद्या प्रकरणात 'व्यष्टी साधना' आणि 'समष्टी साधना' यांच्या व्याख्या किंवा त्यांच्याविषयी विवरण देऊन झाले असेल आणि त्यानंतरही हे शब्द पुन्हा पुन्हा येत असतील, तर अशा ठिकाणी तारतम्याने अवतरणचिन्हे दिली नाहीत, तरी चालते.

– सुप्रिया न. (११.७.२०२३)

-----

**सूत्र. २३ संकलन + उद्गारवाचकचिन्ह + योग्य वापर**

**पंचांग आदींतील एकेकट्या वाक्यांच्या शेवटी उद्गारवाचकचिन्ह देण्याच्या संदर्भात पुढे काही उदाहरणे आणि त्यांसंबंधीचे विवेचन दिले आहे. –**

१. सामाजिक प्रसारमाध्यमांद्वारे शत्रू-राष्ट्राला पूरक असे लघूसंदेश, चलच्चित्रे इत्यादींचा प्रसार करू नका ! (या ठिकाणी पूर्णविराम देऊ शकतो; कारण या वाक्याच्या पुढे आणखी एक वाक्य आले आहे.) त्यापेक्षा राष्ट्रभक्तीचा प्रसार करणारे संदेश इत्यादी पाठवून जनतेचे मनोबल वाढवा !

**२. शासनाची युद्धनीती, सैन्याची हालचाल इत्यादींविषयी अफवा पसरवू नका !** – या ठिकाणी उद्गारवाचकचिन्ह देणे योग्य आहे.

**३. सैन्य अन् शासन यांनी राष्ट्र-सुरक्षिततेसाठी घेतलेल्या निर्णयांना पाठिंबा द्या !** – या ठिकाणी उद्गारवाचकचिन्ह देणे योग्य आहे.

**** वरील तीन वाक्यांविषयी इंग्रजी विभागाने उपस्थित केलेली शंका** – ही वाक्ये सामान्य सूचना आहेत. त्यामुळे त्यांच्या शेवटी उद्गारवाचकचिन्हांऐवजी पूर्णविराम असावा, असे वाटते.

**** ग्रंथ विभागाने यासंबंधी दिलेले उत्तर** – ही वाक्ये सामान्य सूचना नाहीत. राष्ट्र राष्ट्रद्रोहाच्या गर्तेत रुतत असतांना सर्वसामान्य हिंदूंना जागृत आणि कृतीशील करणारी आहेत. त्यामुळे या वाक्यांमधून ठामपणा, जनजागृती, सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेणे, समाजाला चिंतनशील बनवणे आदी गोष्टी साध्य व्हायला हव्यात. त्या होण्यास उद्गारवाचकचिन्हामुळे साहाय्य होते. त्याच्याऐवजी पूर्णविराम दिला, तर ते एक सामान्य वाक्य होईल. वाचक वाचतील आणि सोडून देतील. यांतील केवळ १ क्रमांकाच्या वाक्यातील रंगीत उद्गारवाचकचिन्ह काढू शकतो. त्याच्या जागी पूर्णविराम देऊ शकतो ; परंतु प्रत्यक्ष प्रसारसाहित्यातील त्या वाक्यांची संरचना पाहून त्याविषयी निर्णय घेणे योग्य ठरेल.

– सुप्रिया न. (११.७.२०२३)

–––

सूत्र. २२ संकलन + अर्धविराम + योग्य वापर

**अर्धविरामाच्या वापराच्या संदर्भात पुढे काही उदाहरणे आणि त्यांसंबंधीचे विवेचन दिले आहे. –**

**** अर्धविराम वापरण्याचा कै. मो.रा. वाळंबे यांनी ‘सुगम मराठी व्याकरण’ या पुस्तकात दिलेला नियम** – दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता अर्धविराम हे चिन्ह पहिल्या वाक्याच्या शेवटी दिले जाते.

**** इंग्रजी विभागाने विचारलेली शंका** – आपण वरील नियमाचे पालन करत नाही. सरसकट अर्धविराम वापरतो.

**** ग्रंथ विभागाने दिलेले उत्तर** –

१. वाळंबे यांनी सांगितलेला नियम प्रत्यक्षात वापरायचे ठरवले, तर साधकांचा फार मोठ्या प्रमाणात गोंधळ होऊ शकतो; कारण वाळंबे यांनी ज्या काळात हे पुस्तक लिहिले, त्या काळातील लोकांना भाषेतील सूक्ष्मातीसूक्ष्म छटा ज्ञात होत्या. त्यांचे शब्दोच्चार, वाक्यरचना इत्यादी अभ्यासपूर्ण होते. परंपरेने उत्तम व्याकरण त्यांना शिकवले होते. त्यामुळे 'म्हणून', 'कारण', 'पण', 'परंतु' इत्यादी ठोकताळ्यांची त्यांना आवश्यकता नव्हती. आज ही परिस्थिती पूर्णतः पालटली आहे. समाजाला चार मराठी वाक्येही व्याकरणदृष्ट्या शुद्ध बोलता येत नाहीत. अशा स्थितीत वाळंब्यांचे व्याकरण वापरले, तर लिखाणाला काही चौकट उरणार नाही. त्यासाठी 'म्हणून', 'कारण', 'पण', 'परंतु' इत्यादी शब्दांचा आधार घेऊन लिखाण बंदिस्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

२. लिखाण बंदिस्त करतांना मराठी वाङ्मयात बहुतांश ठिकाणी ज्या शब्दांच्या आधी अर्धविराम दिला जातो, तसेच वाळंब्यांना अर्धविराम देण्याच्या ज्या जागा अपेक्षित आहेत, त्यांचा अभ्यास करून त्यांच्याशी मिळतेजुळते असे शब्द ठरवण्यात आले आहेत.

– सुप्रिया न. (११.७.२०२३)

**** इंग्रजी विभागाने दिलेली अर्धविरामाच्या अयोग्य वापराची उदाहरणे –**

१. हे चक्र जोपर्यंत भगवंताच्या हातात आहे, तोपर्यंत ते 'सुदर्शन'; म्हणजे, हितकारी आणि कल्याणकारी दर्शन असते. – या वाक्यात अर्धविराम चुकीच्या ठिकाणी वापरला आहे. त्या ठिकाणी खरेतर कोणतेही चिन्ह देण्याची आवश्यकता नाही. त्याऐवजी 'म्हणजे' या शब्दानंतर स्वल्पविराम द्यावा.

२. श्रीविष्णूचे मूळ आदिनारायण रूप; तसेच श्रीविष्णूची श्रीराम, श्रीकृष्ण आदी रूपे, यांचा वर्ण श्याम आणि नील असल्याचे वर्णन आढळते. – या वाक्यात अर्धविराम नको. त्याच्याऐवजी स्वल्पविराम द्यावा.

३. तसेच मदरशांची चौकशी चालू आहे; म्हणून..... – येथे अर्धविराम योग्य आहे.

– सुश्री सुप्रिया न. (११.७.२०२३)

--------------------------

**सूत्र. २१ शब्दप्रयोग + आत्महत्या**

**‘आत्महत्या’ हा शब्द वापरण्याविषयीचे धोरण**

**प्रश्न : लिखाणात ‘आत्महत्या’ हा शब्द वापरतांना त्याच्या बाजूला कंसात (देहहत्या) हा किंवा दुसरा शब्द प्रचलित करता येईल का ? कारण आत्म्याची हत्या करता येत नाही.**

**उत्तर :** ‘आत्महत्या’ या शब्दातील ‘आत्म’ याचा अर्थ ‘आत्मा’ असा नाही. ‘आत्म’ म्हणजे ‘स्वतः’, ‘स्वतःचे’ असा आहे. ‘आत्महत्या, म्हणजे स्वतःची हत्या’, अशी त्या शब्दाची फोड आहे.’ त्यामुळे नेहमीप्रमाणे ‘आत्महत्या’ हा शब्द वापरू शकतो. – सुश्री सुप्रिया नवरंगे

– (सूचना लिहिणारी : सौ. समीक्षा गाडे (१४.७.२०२३))
-----

**सूत्र. २० संकलन + मथळा + संत + व्यष्टी + समष्टी + वाक्यरचना**

**‘सातत्याने भगवंताच्या अनुसंधानात असणाऱ्या आणि साधकांना मार्गदर्शन करून घडवणाऱ्या पुणे येथील सनातनच्या १२३ व्या समष्टी संत पू. (सौ.) मनीषा महेश पाठक (वय ४१ वर्षे) !**

वरील मथळ्यात **१२३ व्या समष्टी संत** असे लिहिल्याने त्या ‘१२३ व्या समष्टी संत’ आहेत’, असे वाटू शकते, तसेच व्यष्टी किंवा समष्टी हे संबंधित संतांचे गुणवैशिष्ट्य आहे. त्यामुळे जेव्हा एखाद्या संतांचा उल्लेख येईल, त्या वेळी ‘ते कितवे संत आहेत ?’, ते लिहून कंसात ‘व्यष्टी / समष्टी संत’ असे लिहावे, उदा.

**सातत्याने भगवंताच्या अनुसंधानात असणाऱ्या आणि साधकांना मार्गदर्शन करून घडवणाऱ्या पुणे येथील सनातनच्या १२३ व्या (समष्टी) संत पू. (सौ.) मनीषा महेश पाठक (वय ४१ वर्षे) !**

– प्रमुख साधक (२५.६.२०२३)

(सूचना लिहिणारी : कु. दीपाली होनप (२५.६.२०२३))
––––––

## सूत्र. १९ छायाचित्र + छायाचित्रओळ + कॅप्शन + Caption

‘एका छायाचित्रात अनेक साधक असतील, तर त्या सर्व साधकांच्या नावांची छायाचित्रओळ बनवून ती धारिका पुढे द्यावी, उदा. एका छायाचित्रात ३ साधिका होत्या. त्याची छायाचित्रओळ पुढीलप्रमाणे बनवावी.

छायाचित्रओळ – डावीकडून सौ. श्रद्धा सागर निंबाळकर, सुश्री (कु.) सुजाता जाधव आणि सौ. मधुरा सुहास लोकरे’

– प्रमुख साधक

(सूचना लिहिणारी : दीपाली (२२.७.२०२३))
–––––

## सूत्र. १८ फॉरमॅटींग + प्रमुख साधक + रेषा + डॉश्

प्रमुख साधक लिखाण वाचतांना २०५ % ला मोठे करून (zoom करून) वाचतात. त्यामुळे संकलकांनी पुढील ‘डॉश् डॉश् ची रेषा’ ‘––––––––––––––––––––––’ लिखाणात ओढतांना पुष्कळ मोठी ओढू नये. मोठी ओढल्यामुळे ती प्रमुख साधकांना दोन ओळी दिसते. त्यामुळे दुसरी ओळ त्यांना पुसावी लागते. साधरण २६ डॉश येतील येवढीच रेष ओढावी.
(माहितीसाठी – आपण Ctrl + Insert दाबून जी रेष ओढतो, ती २६ डॉश असलेली रेष आहे. Ctrl + Insert दाबून रेष येण्याची सुविधा सर्वच उपलब्ध असेल असे नाही. त्यामुळे २६ डॉश ची रेषा काढणे, हे लक्षात ठेवावे)

– अमोल, रूपाली (१६.७.२०२३)
–––––

**सूत्र. १७ संकलन + वाक्यरचना + कंस + टीप + अर्थ**

**जेव्हा एखादी व्यक्ती, प्रसंग किंवा वस्तू यांच्याविषयी लेखन करतांना त्यांच्यासंदर्भातील विशेष माहिती द्यावयाची आहे, ती माहिती वाक्य पूर्ण झाल्यावर कंसात लिहू शकतो. म्हणजे वाचकाला वाक्य वाचतांना वाक्य आणि त्याचा अर्थ कळणे सोपे जाईल. – प्रमुख साधक**

**याची दोन उदाहरणे येथे दिली आहेत.**

**अगोदरचे (अयोग्य वाक्यरचना ) :** वर्ष १९९४ – ९५ मध्ये माझा धाकटा भाऊ श्री. राहुल पाटील पुण्यात शिकत असतांना तो रहात असलेल्या खोलीत श्री. पृथ्वीराज हजारे (आताचे सनातन संस्थेचे २५ वे संत पू. पृथ्वी राज हजारे तेव्हा एका आस्थापनात नोकरीला असल्याने ते पुण्यात रहात.) रहात असत.

**पालट केलेले (योग्य वाक्यरचना) :** वर्ष १९९४ – ९५ मध्ये माझा धाकटा भाऊ श्री. राहुल पाटील पुण्यात शिकत असतांना तो रहात असलेल्या खोलीत श्री. पृथ्वीराज हजारे रहात असत. (आताचे सनातन संस्थेचे २५ वे संत पू. पृथ्वीराज हजारे तेव्हा एका आस्थापनात नोकरीला असल्याने पुण्यात रहात.)

**अगोदरचे (अयोग्य वाक्यरचना) :** पुण्यातील सत्संगात श्रीमती उषा मोहे काकूही (आताची आध्यात्मिक पातळी ६२ टक्के. काकू सध्या रामनाथी आश्रमात पूर्णवेळ सेवा करत आहेत.) येत असत.

**पालट केलेले (योग्य वाक्यरचना) :** पुण्यातील सत्संगात श्रीमती उषा मोहे काकूही येत असत. (आताची आध्यात्मिक पातळी ६२ टक्के. काकू सध्या रामनाथी आश्रमात पूर्णवेळ सेवा करत आहेत.)

**– श्री. धैवत वाघमारे (४.७.२०२३)**

––––––

**सूत्र. १६ वय + मथळा + शेवटी**

**लेखात साधकाची २ वेगवेगळी वये आल्यास काय करावे ? :** २० वर्षांपेक्षा कमी वयाच्या आणि ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या साधकांचे लिखाण दैनिकात छापतांना त्यांचे वय छापले जाते. काही वेळा साधकांनी लिखाण लिहून १ ते २ वर्षे झाल्यावर ते दैनिकात प्रसिद्ध होते. त्या वेळी लिखाण देतांनाचे वय आणि धारिका प्रसिद्ध होते, त्या वेळचे वय यांमध्ये फरक पडतो. अशा वेळी दैनिकातून २ वये प्रसिद्ध होऊ नयेत; म्हणून केवळ मथळ्यात साधकांचे वय लिहावे; मात्र लेखाच्या खाली असलेले त्यांचे वय पुसावे. उदा. मथळ्यात .... (वय ६६ वर्षे) असे असेल आणि लेखाच्या खाली .... (वय ६५ वर्षे), सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. (२.११.२०२०) ... असे असेल, तर लेखाच्या खाली दिलेल्या **नावापुढील वय**, ६५ वर्षे हे पुसावे.

**– सूत्र दिले, सौ. समीक्षा (२०.९.२०२१)**
**– शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

**सूत्र. १५ टोपणनाव + उल्लेख + कवी + लेखक + मथळा + मजकूर**

**टोपणनावाने लिहिणारे कवी आणि लेखक यांच्यासाठी धोरण**

**मथळा – ‘दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित दिवंगत कवी प्रदीप यांनी देशाच्या स्वातंत्र्याविषयी हिंदूंना विचारलेले काही प्रश्न !’** असा असेल, तर ...

१. मथळ्यात ‘कवी प्रदीप’ या प्रचलीत टोपण नावाचा उल्लेख करणे

२. बातमीत किंवा लेखात प्रथम ज्या ठिकाणी **‘कवी प्रदीप’** असा उल्लेख येईल, तेथे त्यांचे खरे नाव **‘रामचंद्र द्विवेदी’** असे कंसात लिहिणे. अन्यत्र ‘कवी प्रदीप’ असे ठेवणे.

**– सूत्र लिहिले. – सौ. समीक्षा (२०.९.२०२१)**
**– शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

सूत्र. १४ शब्द + लिहिण्याविषयी

**‘स्विडन’ शब्द लिहिण्याविषयी :** प्रचलित मराठीमध्ये ‘स्वीडन’ असे लिहिले जाते; मात्र इंग्रजी व्यंजने जेथे येतात, ते अक्षर ऱ्हस्व लिहिण्याचा नियम आहे. त्या नियमानुसार ‘स्विडन’ असे लिहावे. – कु. सुप्रिया नवरंगे २३.१.२०२३

**– शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

----------------

सूत्र. १३ शब्दप्रयोग + प्रतिपादन

**प्रतिपादन या शब्दाचा वापर करण्याविषयी :** प्रतिपादन या शब्दाचा अर्थ ‘उद्‌गार’ असा आहे. प्रतिपादन म्हणजे साध्या विषयावरील उद्‌गार ! ‘वर्ष २०२५ चा गुढीपाडवा हिंदु राष्ट्रात साजरा केला जाईल’, असे प्रतिपादन सनातनच्या धर्मप्रचारक सद्‌गुरु स्वाती खाडये यांनी केले. – अशा प्रकारच्या वाक्यात प्रतिपादन हा शब्द न वापरता असे त्यांनी सांगितले / असे आश्वस्त केले / असे त्या म्हणाल्या, अशा प्रकारचे शब्द लिहावेत. (हिंदु राष्ट्र आत्ता अस्तित्वात आलेले नाही. ते येणार आहे, याची त्या निश्चिती देत आहेत. त्यामुळे येथे ‘प्रतिपादन’ हा शब्द नको.) – कु. सुप्रिया नवरंगे (३०.१.२०२३)

**शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

---------------

सूत्र. १२

**एखाद्या कमिटीचे हिंदी नाव असतांना कंसात पर्यायी मराठी शब्द लिहिण्याविषयी :** दैनिकातील एका वृत्तात ‘देहली सिख गुरुद्वारा प्रबंधक कमेटी’ असे हिंदी नाव होते. असे नाव लिहितांना अधोरेखित शब्दानंतर, म्हणजे सिख नंतर कंसात (शीख) असे लिहावे. **‘देहली सिख (शीख) गुरुद्वारा प्रबंधक कमेटी’** अशा प्रकारे नाव लिहावे. – श्री. प्रशांत कोयंडे (३०.१.२०२३)

**शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

-----------------

## सूत्र. ११ **शब्द + लिहिण्याविषयी + टिवटर + ट्वीट**

**‘टिवटर’ आणि ‘ट्वीट’ या शब्दांविषयी**

अ. ‘ट्विटर’ या शब्दातील वेलांटी र्‍हस्व लिहावी; कारण त्याचे स्पेलिंग ‘twitter’ असे होते.
आ. ट्वीटचे स्पेलिंग ‘tweet’ असे असल्यामुळे वेलांटी दीर्घ लिहून ‘ट्वीट’ असे लिहावे.

– सुश्री सुप्रिया नवरंगे + सौ. समीक्षा गाडे (१४.४.२०२३)
**शंका सोडवून नियम जून २०२३ मध्ये अंतिम केला – पल्लवी**

-----

## सूत्र. १० **शब्द + अर्थ + लिहिण्याविषयी**

नामधुनी (देवतांचे स्तुतीपर, स्वरबद्ध आणि लयबद्ध संकीर्तन) – प्रत्येक वेळी नामधुनी हा शब्द आल्यास आरंभी हा अर्थ घेणे – प्रमुख साधक
सूत्र लिहिले – सौ. नाफडे (१०.६.२०२३)
------

## ~~सूत्र. ९~~ **२८ क्रमांचे हे सूत्र आहे, त्यामुळे हे नको**

~~१. लेखात प्रथम ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ’, असा, त्यानंतर ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ’ आणि नंतर सर्व ठिकाणी ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) गाडगीळ’, असा उल्लेख करावा.~~

~~२. ‘श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदाताई’ किंवा ‘श्रीचित्‌शक्ति (सौ.) गाडगीळकाकू’ असा उल्लेख न करता वरीलप्रमाणे उल्लेख करावा.~~

~~सूचना लिहिणारी – कु. दीपाली होनप (२२.६.२०२३)~~

---------------------------

## सूत्र. ८ **संकलन + गुरुपादुकाष्टक + सुधारणा**

'वर्ष २०१९ मध्ये प्रमुख साधकांनी (गुरुपादुकांला ×) गुरुपादुकांना अशी सुधारणा कळवली. गुरुपादुकाष्टकातील कोणताही श्लोक छापतांना ही सुधारणा करू शकतो आणि खालील संदर्भही त्या ठिकाणी छापू शकतो.' – श्री. गिरिधर (२०.३.२०२३)

'ज्या संगतीनेंच विराग झाला ।
मनोदरींचा जड भास गेला ।।
साक्षात्परात्मा मज भेटवीला ।
विसरूं कसा मी (गुरुपादुकांला ×) गुरुपादुकांना ।।'

– 'गुरुपादुकाष्टक (दत्तभक्त तथा प्रसिद्ध संतकवी श्री नारायण महाराज जालवणकर, जन्म : शके १७१५ – शके १७९०, जन्मगाव : झाँसीजवळ 'जालवण'– 'इंटरनेट'वर मिळालेली माहिती)' – **पडताळले (५.७.२०१९)**

---------------------------

## सूत्र. ७ **संत + नाव + उल्लेख + प.पू. भक्तराज महाराज + प.पू. रामानंद महाराज**

यापुढे परमपूज्य रामानंद महाराज यांचा उल्लेख करतांना '**प.पू. भक्तराज महाराज यांचे उत्तराधिकारी आणि सनातन संस्थेचे प्रेरणास्थान प.पू. रामानंद महाराज**' **किंवा प.पू. रामानंद महाराज (प.पू. भक्तराज महाराज यांचे उत्तराधिकारी आणि सनातन संस्थेचे प्रेरणास्थान )** ...असा करावा', असा निरोप प्रमुख साधकांनी दिला आहे. यात काही अडचण किंवा शंका असल्यास त्या त्या वेळी संबंधितांनी पुढे विचारून घ्याव्यात.

– श्री. योगेश जलतारे, ६.३.२०२३

------

## सूत्र ६. **सूक्ष्मचित्र + सत्यता + सद्गुरु (डॉ.) मुकुल गाडगीळ**

ज्या सूक्ष्म-चित्राच्या धारिकेत सत्यता काढायची असते, ती धारिका संकलन करून सद्गुरु (डॉ.) मुकुल गाडगीळ यांना पडताळण्यासाठी ठेवावी. सद्गुरु काकांनी पडताळल्यावर प्रमुख साधकांना पडताळायला ठेवावी. **सूक्ष्म-चित्राच्या धारिकेत सत्यताच्या वर्णनाखाली सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले असे न लिहिता यापुढे (सद्गुरु) डॉ. मुकुल गाडगीळ, असे पुढील प्रमाणे लिहावे – रूपाली (१०.२.२०२३)**

**सूक्ष्म-चित्राचा दिनांक : --**

**सूक्ष्मातील परिणाम दर्शवणाऱ्या चित्राचा संकेतांक : .......**

**१. 'सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या चित्राची सत्यता** (वस्तूस्थितीशी जुळण्याचे प्रमाण) **: –** टक्के

**२. सूक्ष्म ज्ञानाविषयीच्या चित्रातील सात्त्विक स्पंदने : –** टक्के'

**– (सद्गुरु) डॉ. मुकुल गाडगीळ**

**सूत्र लिहिणारी : मयुरा (४.३.२०२३)**
**---------------------------**

**सूत्र ५. शब्दप्रयोग + भावप्रयोग + भावजागृतीचा प्रयोग + भावाचे प्रयत्न + भावजागृतीचे प्रयत्न**

'भावप्रयोग' हा शब्द न वापरता 'भावजागृतीचा प्रयोग', हा शब्द वापरावा, तसेच 'भावाचे प्रयत्न', हा शब्द न वापरता 'भावजागृतीचे प्रयत्न', हा शब्द वापरावा.' – कु. दीपाली होनप (१३.२.२०२३)
---------------------------

**सूत्र ४. महर्षी अध्यात्म विश्वविद्यालय + संगीत विभाग + पत्ता**

* महर्षी अध्यात्म विश्वविद्यालय म्हणून ज्या साधकांचा आपण उल्लेख करतो, त्यांच्या

लिखाणात पत्ता ‘फोंडा, गोवा’, असा घालावा. ज्या साधकांचे गोव्यात घर आहे, त्यांच्या घराचा पत्ता देऊ शकतो. (‘सनातन आश्रम, रामनाथी’, असा लिहू नये.)

* संगीत विभागातील साधकांचे संगीताविषयी लिखाण छापतांना ‘महर्षि अध्यात्म विश्‍वविद्यालय, गोवा’, असा पत्ता घालणे. संगीत विषयक मजकुराव्यतिरिक्त अन्य लिखाण छापतांना ज्या साधकांचे गोव्यात घर आहे, त्यांच्या घराचा पत्ता देऊ शकतो. अन्य साधकांना केवळ ‘फोंडा, गोवा’, असे लिहावे.

असे करतांना ज्या साधकांविषयी आपल्याला शंका येते, त्यांच्याविषयीचा अभ्यास मुख्य व्यवस्थापक यांना विचारून घ्यावा, असे त्यांनी सांगितले आहे.

– कु. सायली डिंगरे (नोव्हेंबर २०२२), गांधीकाका (२३.१.२०२३)
---------------------------

**सूत्र ३. शब्दप्रयोग + तोंडवळा + चेहरा**

**‘तोंडवळा’ हा शब्द न वापरता ‘चेहरा’ हा शब्द वापरावा :** ‘चेहरा’ हा शब्द फारसी असल्यामुळे आपण आतापर्यंत तो वापरत नव्हतो. त्याच्या जागी ‘तोंडवळा’ हा शब्द वापरत होतो; पण ‘तोंडवळा’ हा शब्द उच्चारायला चांगला वाटत नाही, तसेच विविध प्रकारच्या वाक्यरचनांमध्ये तो चपखल बसतही नाही. त्यामुळे येथून पुढे आपण ‘तोंडवळा’ हा शब्द वापरणे बंद करणार आहोत. त्याच्या जागी ‘चेहरा’ हाच शब्द वापरायचा आहे. – सुश्री सुप्रिया नवरंगे (१०.११.२०२२)
---------------------------

**सूत्र २. संकलन + वाक्यरचना + शब्दप्रयोग + असावयास + असायला**

**‘असावयास’ हा शब्द न वापरता ‘असायला’ हा शब्द वापरावा :** लेखनात आपण ‘असावयास हवे’, ‘करावयाचे नाही’, ‘आणावयास हवे’ अशा प्रकारची शब्दरचना करतो. विशेषतः स्वतःचे स्वतंत्र लेखन करतो, तेव्हा अशी वाक्यरचना केली जाते. आता अशी वाक्यरचना करू नये. त्याच्या जागी ‘असायला हवे’, ‘करायचे नाही’, ‘आणायला हवे’, अशी शब्दरचना करावी. – सुश्री सुप्रिया नवरंगे (१०.११.२०२२)

--------------------------

**सूत्र १. परात्पर गुरु डॉ. आठवले + सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले + उल्लेख**

साधकांनी लिखाणात परात्पर गुरु डॉ. आठवले यांचे नाव जसे लिहिले असेल, तसेच ठेवावे, उदा. एखाद्या साधकाने वर्ष २०२२ च्या गुरुपौर्णिमेनंतरच्या अनुभूतीत ‘परात्पर गुरु डॉक्टर’ असे लिहून दिले असले, तर ते तसेच ठेवावे. त्यात ‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले’ असा पालट करू नये’, असे प्रमुख साधकांनी सांगितले.

– रूपाली (३.१०.२०२२)